आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
५ नोव्हेंबर २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उद्या मतदान

- स्टारलिंक आणि महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामुळे राज्यातल्या दुर्गम भागापर्यंत इंटरनेट सेवा पोहोचवणं सुलभ होईल, असा मुख्यमंत्र्यांचा विश्वास

- डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहिमेच्या चौथ्या टप्प्याला सुरुवात

**आणि**

- गुरू नानक जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन, त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त मंदिरं आणि जलाशयांत दीपोत्सव साजरा

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यातल्या १२१ विधानसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. एकंदर एक हजार ३१४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य तीन कोटी ७५ लाखांहून अधिक मतदार ठरवतील. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, एनडीए आणि महाआघाडीच्या नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले. पहिल्या टप्प्यात, नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील १६ मंत्र्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागणार आहे, त्यापैकी ११ भाजपचे आहेत. भाजपकडून उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि विजय कुमार सिन्हा हे अनुक्रमे तारापूर आणि लखीसराय मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये आहेत. महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी प्रसाद यादव हे राघोपूर विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. पहिल्या टप्प्यासाठी निवडणूक आयोगाने कडक सुरक्षा व्यवस्था केली आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, पहिल्यांदाच प्रत्येक मतदारसंघात एक निरीक्षक तैनात केला जाणार असून निवडणूक प्रक्रियेवर बारकाईनं लक्ष ठेवण्यासाठी सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग होणार आहे. पुरेशा प्रमाणात केंद्रीय सशस्त्र पोलिस दल देखील तैनात केले जाईल. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. रालोआ तसंच महायुतीच्या स्टार प्रचारक आणि ज्येष्ठ नेत्यांनी सीमांचल, चंपारण आणि मेगध क्षेत्रासह विविध भागात प्रचारसभा घेतल्या.

**<><><><><>**

बिहारच्या निवडणुकीत यश मिळणार नाही हे लक्षात आल्यावर काँग्रेस नेता राहुल गांधींनी हरियाणातला बनावट मतदारांचा मुद्दा उपस्थित केल्याची टीका केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते किरेन रिजीजू यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत केली. हरियाणात काँग्रेसचा पराभव झाल्याबद्दल राहुल गांधी भाजपाला दोष देत आहेत. मात्र काँग्रेस अंतर्गत विसंवादामुळे त्यांचा पराभव झाल्याचं त्यांच्याच नेत्या कुमारी शैलजा यांनी सांगितलं होतं, असं रिजीजू म्हणाले. निवडणुकीत भाजपाने हस्तक्षेप केल्याचा आरोप फेटाळून लावत गांधी विदेशात जाऊन देशातल्या यंत्रणांवर टीका करतात असं रिजीजू म्हणाले. मतदानापासून मतमोजणीपर्यंतची प्रक्रिया पारदर्शक असते, काँग्रेसला काही शंका असेल तर त्यांनी न्यायालयात जावं असा सल्लाही त्यांनी दिला.

त्याआधी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत हरियाणा विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचे आरोप केले. हरियाणा विधानसभा निवडणुकीत २५ लाख बनावट मतदार तयार करण्यात आले, असा गंभीर आरोप गांधी यांनी केला. यावेळी एकाच छायाचित्राच्या नावासमोर वेगवेगळी नावं असल्याचं गांधी यांनी निदर्शनास आणून दिलं. तसंच दुबार मतदार आणि मतदारांचे चुकीचे पत्ते मतदार यादीत नोंदवले गेल्याचा आरोप केला. दरम्यान,

राहुल गांधी यांनी पुराव्यासह मतदान प्रक्रियेतल्या त्रुटी दाखवून दिल्या, मात्र निवडणूक आयोग याची दखल घेत नाही असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. ते वर्धा इथं वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्यात आज सामंजस्य करार झाला. या करारामुळे राज्यातल्या दुर्गम भागापर्यंत इंटरनेट सेवा पोहोचवणं सुलभ होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. स्टारलिंक महाराष्ट्राशी भागीदारी करत असल्याने डिजीटल दरी मिटणार आहे. प्रत्येक शाळा, आरोग्य केंद्र आणि गाव आता डिजिटल संपर्कात येणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. स्टारलिंकशी करार करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

या धोरणात्मक भागीदारीअंतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महाराष्ट्र शासन आणि स्टारलिंक मिळून राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांना जोडण्यासाठी कार्य करतील. यात आदिवासी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, आपत्ती नियंत्रण कक्ष, वन चौक्या, किनारी क्षेत्र, तसंच गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश आहे. या उपक्रमाचा उद्देश राज्यातल्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा मार्गांवर उपग्रहाधारित जोडणी उपलब्ध करून देणं आहे. तसंच शिक्षण आणि टेलिमेडिसिन क्षेत्रातही स्मार्ट कनेक्टिव्हिटीचा लाभ देण्याची योजना आहे. महाराष्ट्र-स्टारलिंक सहकार्यामुळे ‘डिजिटल महाराष्ट्र’ या मिशनला अधिक गती मिळणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

२५ लाखांहून अधिक निवृत्तीवेतनधारकांनी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहिमेअंतर्गत चेहरेपट्टी प्रमाणीकरण तंत्रज्ञानाचा वापर केला असून यात सातत्यानं वाढ होत असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. डिजिटल

जीवन प्रमाणपत्र मोहिमेचा चौथा टप्पा आज सिंह यांच्या उपस्थितीत सुरु करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. ९० वर्षांहून अधिक वय असलेल्या ३० हजारहून जास्त ज्येष्ठ नागरिकांना या तंत्रज्ञानाचा लाभ होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांच्या पाचशे छप्पन्नाव्या जयंतीनिमित्त आज प्रकाश पर्व साजरं केलं जात आहे. नांदेडच्या सचखंड गुरुद्वारामधे आज भाविकांनी हजारोंच्या संख्येने गर्दी केली आहे. सकाळी गुरुग्रंथाच्या अखंड पाठाची समाप्ती झाली. गुरुद्वाराच्या आवारात विशेष सजावट करण्यात याली असून फटाक्यांची आतिषबाजी होत आहे. गुरु ग्रंथसाहेबची चौकी काल नांदेडहून रवाना झाली ती आज कर्नाटकात बिदर इथल्या गुरुद्वारा नानकझीरा साहिब इथं पोहोचली. उद्या ही चौकी विशेष रेल्वे गाडीने नांदेडला परत यायला निघेल.

नागपूरमधे जरीपटका इथं गुरुनानक जयंती निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. अहिल्यानगर शहरात जो बोले सो निहाल, सत श्री अकाल... च्या जयघोषात भाई कुंदनलालजी गुरुद्वारा पासून शीख, पंजाबी आणि सिंधी समाजाच्या वतीने पारंपरिक वाद्यांसह प्रभातफेरी काढण्यात आली होती. यावेळी उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास म्हणजे प्रार्थना करुन सुख, समृध्दी आणि शांततेसाठी प्रार्थना केली. राज्यातल्या विविध गुरुद्वारांमधे गुरु नानक जयंती निमित्त लंगर, भजन, कीर्तन अशा कार्यक्रमांचं आयोजंन करण्यात आलं आहे.

कार्तिक पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमा आज सर्वत्र श्रद्धापूर्वक पारंपरिक पद्धतीने साजरी होत आहे. त्यानिमित्त ठिकठिकाणी विशेषतः नदीकाठांवर आणि जलाशयांजवळ दीपोत्सवांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं कृत्रिम बुद्धमत्ता नियमनासंबंधीची मार्गदर्शक तत्व जारी केली. विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता

तंत्रज्ञानाचा सुरक्षित, समावेशक आणि जबाबदारीपूर्ण अवलंब होईल याची सुनिश्चिती यामुळे होणार असल्याचं प्रधान वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार सूद यांनी सांगितलं. या मार्गदर्शक तत्वांमुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या चूकीच्या वापरामुळे व्यक्तिगत तसेच सामाजिक पातळीवरील धोके कमी होतील असं ते म्हणाले. कोणतंही नुकसान करू नका हाच या मार्गदर्शक तत्वांचा गाभा असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नौदलाच्या मोठ्या टेहेळणी जहाजांच्या श्रेणीतलं तिसरं जहाज ‘ईक्षक’ हे उद्या कार्यान्वित होणार आहे. कोची इथं समारंभपूर्वक हे जहाज भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होऊन नौदलाच्या दक्षिण कमांडमधे तैनात होणार आहे.

कोलकाता इथल्या गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स लिमिटेडनं बांधलेल्या या जहाजात ८० टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी सामग्रीचा वापर झाला आहे. बंदरं, जहाजांचे तळ आणि खोल समुद्रातल्या नौवहन मार्गांच्या टेहळणीसाठी हे जहाज उपयुक्त ठरेल. यादृष्टीनं हे जहाज अत्याधुनिक उपकरणं, स्वनियंत्रित पाणबुडी, रिमोट आधारीत नौका, सर्वेक्षणासाठीच्या मोटार बोटी अशा सुविधांनी सज्ज आहे. यासोबतच जहाजावर हेलिकॉप्टर डेकची सोयही उपलब्ध आहे.

**<><><><><>**

मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या पथकानं गेल्या चार दिवसांत केलेल्या कारवाईत अंमली पदार्थाचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाई दरम्यान विविध उड्डाणांमधून आलेल्या पाच प्रवाशांकडून १३ किलोहून अधिक अंमली पदार्थ आणि सुमारे ८७ लाख रुपये किमतीचं परदेशी चलन जप्त करण्यात आलं आहे. संबंधित प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं दक्षिण आफ्रिकेसोबतच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी १५ सदस्यीय संघाची आज घोषणा केली. या संघात उपकर्णधार ऋषभ पंत यानं पुनरागमन केलं आहे, तर वेगवान गोलंदाज आकाशदीप याचंही पुनरागमन झालं आहे. प्रसिद्ध कृष्णा आणि एन जगदिशन यांना या संघातून वगळण्यात आलं आहे.

संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी शुभमन गिल याच्याकडे असेल. या मालिकेतला पहिला सामना येत्या १४ नोव्हेंबरपासून कोलकाता इथं, तर दुसरा सामना २२ नोव्हेंबरला गुवाहाटी इथं खेळला जाणार आहे.

**<><><><><>**

व्यवसाय सुलभतेला चालना देण्याच्या उद्देशाने भारत सरकार कर निर्बंध कमी करणे, लालफितशाहीचे उच्चाटन करणे आणि नियमांचा भार कमी करणे यांसारखे उपाय योजत असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं. त्यांनी आज न्यूझीलंड मध्ये भारतीय समुदायाला संबोधित करताना ही माहिती दिली. भारताला आकर्षक स्थान बनवणे हा सरकारचा उद्देश असल्याचं ते म्हणाले. न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर ल्युक्सॉन आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्री टॉड मॅक्ले यांचीही त्यांनी भेट घेतली. दोन्ही देशांदरम्यान सागरी, अंतराळ, संरक्षण, क्रीडा आणि पर्यटन क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर गोयल यांनी भर दिला.

**//<><><><><>//**